अर्ज जा.क्र. ....................
अर्जदाराचे नांव :– श्री. रोहिदास रामभाऊ धावडे
नक्कल अर्ज प्राप्त दि. :– 05/10/2018
नक्कल तयार दि. :– 08/10/2018
नक्कल दिली तो. दि. :–

महा./ 1574 /2018/पुणे
दिनांक 5/10 /2018/पुणे

सहाय्यक संस्था निबंधक
पुणे विभाग, पुणे

Asst. Charity Commissioner Pune

## परिशिष्ट—ब

## ''श्रीराममुक्ता एज्युकेशन सोसायटी''

अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय पुणे विभाग पुणे

१)संस्थेचे नाव :– ''श्रीराममुक्ता एज्युकेशन सोसायटी''

२)संस्थेचा पत्ता :-- व्दारा. श्री. रोहिदास रामभाऊ धावडे स.नं. १५ रामभाऊ धावडे चाळ, विठ्ठल मंदिराजवळ, उत्तम नगर, पुणे ४११०२३-

३)संस्थेचे कार्यक्षेत्र :– महाराष्ट्र राज्य.

४)उददेश :– सदरील संस्थेचे सर्व उद्देश धर्मादाय स्वरूपाचे आहेत. संस्थेतर्फे कला, क्रीडा सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, सांस्कृतिक, या क्षेत्रांचा विकास घडविण्यासाठी खालील स्वरूपाचे उददेश राबविले जातील.

शैक्षणिक

१. शिक्षणाचा प्रसार व प्रचार करणे. त्यासाठी मराठी व इंग्रजी माध्यमिक शिक्षण संस्था सुरू करणे तसेच डी.एड.बी.एड. नाईट स्कूल, महाविद्यालय, अभियांत्रिकी पदवी, पदविका अभ्यासक्रम, पॅरामेडीकल अभ्यासक्रम, व्यवस्थापनशास्त्राचे अभ्यासक्रम, सर्व वैद्यकिय व उच्च तंत्रशिक्षण, कृषी पदविका अभ्यासक्रम, अभ्यासिका, वाचनालय, ग्रंथालय, औद्योगिक अभ्यासक्रम, संगणक, परिचारिका, ग्रंथपालन वर्ग व इतर शैक्षणिक क्षेत्रातील सर्व प्रकारच्या संस्था सुरू करणे तसेच करिअर कोर्सेस व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करणे.
२. निरक्षरता निर्मुलनसाठी साक्षरतेचा पुरस्कार करणे.
३. संस्थेतर्फे तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षणाचे महत्व पटवून देणे. त्यासाठी विविध स्तरांवर मराठी व इंग्रजी माध्यमातील बालवाडी ते प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, महाविद्यालयापर्यंत शिक्षणासाठी अभ्यासिका, वाचनालय, ग्रंथालय, औद्योगिक, तांत्रिक, माहिती, परिचारीका, संगणक प्रशिक्षण ग्रंथपालन वर्ग सुरू करणे.
४. गरजू व हुशार विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे व त्यांना राहण्यासाठी वसतीगृहाची स्थापना करणे.
५. तसेच अदिवासी करीता शिक्षणाच्या सोई सुविधा मिळणेकरीता कार्य करणे व त्यांच्या सर्वांगिण विकास साधणे, आश्रमशाळा सुरू करणे. त्यांना शिक्षण व शिक्षण साहित्य उपलब्ध करून देणे.
६. सर्व विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी अभ्यासिका पुस्तकपेढी, ग्रंथालय सुरू करणे.
७. संस्थेच्या माध्यतातुन सर्व धर्मातील लोकांसाठी तसेच अल्पसंख्याक, मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय यांच्यासाठी असलेल्या योजनांतर्गत शैक्षणिक संस्था व वसतीगृह, आश्रमशाळा निवासीशाळा सुरू करणे.
८. प्रौढ शिक्षणाच प्रसार करणे, प्रौढ शाळा सुरू करणे व चालविणे.

श्री. रोहिदास धावडे — अध्यक्ष
सौ. आशा धावडे — उपाध्यक्ष
श्री. रोहन धावडे — सचिव

PRESIDENT
SHRI RAMMUKTA EDUCATION SOCIETY
Uttamnagar, Pune-411 023.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

(65)

Asst. Charity Commissioner Pune

९. वसतीगृह व शाळा बांधण्यासाठी जागा उपलब्ध करणे, उदा. बक्षिसपत्र व भाडेतत्वावर तसेच खाजगी, सरकारी जागा संस्थेसाठी उपलब्ध करून करणे.

१०. पालक शिक्षक, प्रशिक्षक, कर्मचारी—यांसाठी प्रशिक्षण केंद्र चालविणे.

सामाजिक व सांस्कृतिक :—

१. समाजात एकोपा निर्माण करण्यासाठी विविध राष्ट्रीय सण उत्सव साजरे करणे त्यानिमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे. उदा. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, महाराष्ट्र दिन तसेच थोर राष्ट्रीय नेत्यांच्या जयंती व पुण्यतीथी या निमित्त सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे.

क्रीडा:—

१. विद्यार्थ्यासाठी सर्व प्रकारच्या क्रीडा स्पर्धाचे आयोजन करणे, नवोदित व होतकरू खेळाडूंना प्रोत्साहन देणे, त्यांना क्रीडा साहित्य पुरविणे, योग्य ते मार्गदर्शन देणे, तज्ञ प्रशिक्षकांची नेमणूक करणे व विविध खेळांचे प्रशिक्षण वर्ग सुरू करणे.

२. अत्याधुनिक व्यायाम साहित्यांची सुसज्ज अशी व्यायामशाळा सुरू करणे व विवध स्तरांवर शरिरसौष्ठव, ज्युडो, कराटे, कबड्डी, क्रिकेट, खो—खो, हॉकी, फुटबॉल, कुस्ती अशा अनेक विविध प्रकारच्या मैदानी खेळांच्या स्पर्धा आयोजित करणे.

३. स्थानिक जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्व प्रकारच्या खेळाचे प्रशिक्षण शिबिर, चर्चासत्र, कार्यशाळा व स्पर्धा स्वत: व इतर संस्था संघटना यांच्या मदतीने आयोजित करणे.

वैद्यकिय :—

१. गरीब व गरजू रूग्णांना वैद्यकिय सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी विविध प्रकारची वैद्यकिय शिबिरांचे आयोजन करणे उदा. रक्तदान, नेत्रदान, नेत्रचिकित्सा, आरोग्य, बालचिकित्सा इ.

२. रक्तपेढी, नेत्रपेढी फिरता दवाखाना रूग्णलय, प्राथमिक उपचार केंद्र सुरू करणे तसेच रूग्णवाहीका, शववाहिका सुरू करणे व

श्री. रोहिदास धावडे
अध्यक्ष

सौ. आशा धावडे
उपाध्यक्ष

श्री. रोहन धावडे
सचिव

PRESIDENT
SHRI RAMMUKTA EDUCATION SOCIETY
Uttamnagar, Pune-411 023.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

(5)

66

समाजातील सर्व स्तरांतील लोकांसाठी उपलब्ध करून देणे, गरीब व गरजू रूग्णांना मोफत औषधोपचार करणे वैद्यकिय उपचारांसाठी मदत करणे.

कलाः—

१. नृत्य, गायन, वादन, चित्रकला, यारख्या कलांचा प्रसार व प्रचार करणे, त्यासाठी स्पर्धा व कार्यक्रमांचे आयोजन करणे.

२. विविध विषयांवर लेखन करणा—या लेखक व कवी यांना आमंत्रित करून चर्चासत्र व परिसंवाद, व्याख्यानमाला आयोजित करणे, प्रसिध्द पुस्तक, ग्रंथाचे प्रदर्शन आयोजित करणे.

५) सदरहू संस्थेच्या नियम व नियमावलोनुसार ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेची जबाबदारी व व्यवस्था सापेविली आहे अशा कार्यकारी मंडळातील पहिल्या सभासदांची संपूर्ण नावे व पत्ता,वय,व्यवसाय,पदे व राष्ट्रीयत्व पुढीलप्रमाणे राहतील.

| क. | सभासदांचे नाव व पत्ता | वय | व्यवसाय | पद | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. रोहिदास रामभाऊ धावडे<br>स.नं. १५ रामभाऊ धावडे चाळ, विठ्ठल मंदिराजवळ, उत्तम नगर, पुणे ४११०२३ | ६१ | नोकरी | अध्यक्ष | भारतीय |
| २ | सौ. आशा रोहिदास धावडे<br>स.नं. १५ रामभाऊ धावडे चाळ, विठ्ठल मंदिराजवळ, उत्तम नगर, पुणे ४११०२३ | ५६ | गृहिणी | उपाध्यक्ष | भारतीय |
| ३ | श्री. रोहन रोहिदास धावडे<br>स.नं. १५ रामभाऊ धावडे चाळ, विठ्ठल मंदिराजवळ, उत्तम नगर, पुणे ४११०२३ | २७ | शिक्षण | सचिव | भारतीय |
| ४ | सौ. अश्विनी प्रणय काटे<br>बिल्डींग नं. ०४, फ्लॅट नं. ४०२, एस व्ही रोड, प्रेम नगर, बोरीवली वेस्ट मुंबई ४०००९२ | ३३ | गृहिणी | खजिनदार | भारतीय |

श्री. रोहिदास धावडे — अध्यक्ष
सौ. आशा धावडे — उपाध्यक्ष
श्री. रोहन धावडे — सचिव

PRESIDENT
SHRI RAMMUKTA EDUCATION SOCIETY
Uttamnagar, Pune- 411 023.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

Asst. Charity Commissioner Pune

(6)

(67)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | श्री. दिपक गजानन गव्हाणे<br>गव्हाणे आळी, शिवाजी पुतळया जवळ, पिंपरी गाव, पुणे ४११०१७ | ५१ | नोकरी | सदस्य | भारतीय |
| ६ | श्री ऋषिकेश भानुदास कलाटे<br>स.नं. १४७/२/३, रामचंद्र निवास वाकडकर वस्ती, मारूंजी, वाकड, पुणे ४११०५७. | २१ | शिक्षण | सदस्य | भारतीय |
| ७ | कु. स्नेहल रोहिदास धावडे<br>स.नं. १५ रामभाऊ धावडे चाळ, विठ्ठल मंदिराजवळ, उत्तम नगर, पुणे ४११०२३. | २८ | शिक्षण | सदस्य | भारतीय |
| ८ | सौ. कावेरी योगेश कटके<br>घर नं. ६३८, एनडीए गेट जवळ, कोंढवे–धावडे, पुणे ४११०२३. | ३२ | गृहिणी | सदस्य | भारतीय |
| ९ | सौ. सुनिता प्रदिप गव्हाणे<br>गव्हाणे आळी, पिंपरी वाघिरे, पिंपरी, पुणे ४११०१७. | ४८ | गृहिणी | सदस्य | भारतीय |

६) आम्ही खाली सहया करणारे ''श्रीराममुक्ता एज्युकेशन सोसायटी''. या संस्थेचे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत असलेली संस्था अस्तित्वात आणण्याची इच्छा असून वरील उददेशाने आम्ही एकत्र येउन ''श्रीराममुक्ता एज्युकेशन सोसायटी'' ही संस्था आज दिनांक २७/०९/ २०१८ रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या ज्ञापनावर सहया करीत आहोत.

| क. | सभासदांचे नाव व पत्ता | स्ही |
|---|---|---|
| १ | श्री. रोहिदास रामभाऊ धावडे | [signature] |
| २ | सौ. आशा रोहिदास धावडे | सौ. ए आर धावडे |
| ३ | श्री. रोहन रोहिदास धावडे | [signature] |

श्री. रोहिदास धावडे — अध्यक्ष
सौ. आशा धावडे — उपाध्यक्ष
श्री. रोहन धावडे — सचिव

PRESIDENT
SHRI RAMMUKTA EDUCATION SOCIETY
Uttamnagar, Pune-411 023.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

Asst. Charity Commissioner Pune

(7)

(68)

Asst. Charity Commissioner Pune

| | | |
|---|---|---|
| ४ | सौ. अश्विनी प्रणय काटे | Ashwini |
| ५ | श्री. दिपक गजानन गव्हाणे | [signature] |
| ६ | श्री ऋषिकेश भानुदास कलाटे | RKalate |
| ७ | कु. स्नेहल रोहिदास धावडे | [signature] |
| ८ | सौ. कावेरी योगेश कटके | KyKatake |
| ९ | सौ. सुनिता प्रदिप गव्हाणे | Sunita. P Gavan |

''परिशिष्ट ब'' वर सर्व सहया करणाया इसमांना मी ओळखतो व त्यांनी माझ्या समक्ष या विधानपत्रावर सहया केलेल्या आहेत.

स्थळः पुणे, दिनांक :–०१/१०/२०१८.

Adv. Parag Jagannath [illegible]
B.Sc., L.L.B., M.S. [illegible]
M-6[illegible], Laxminagar,
Parvati, Pune-9
MAH 1194/2005

प्रमाणपत्र

या वरून असे प्रमाणित करण्यात येते की ''श्रीराममुक्ता एज्युकेशन सोसायटी'' या नावाची अथवा या नावात साम्य असणारी दुसरी कोणतीही संस्था अस्तित्वात आलेली नाही किंवा सन १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमानुसार नोंदणी झालेली नाही किंवा अस्तित्वात आलेली नाही.

| | | |
|---|---|---|
| श्री. रोहिदास धावडे | सौ. आशा धावडे | श्री. राहुल धावडे |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

PRESIDENT
SHRI RAMMUKTA EDUCATION SOCIETY
Uttamnagar, Pune-411 023.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

(8)

(०९)

महा./ 1574/2018/पुणे
दिनांक 5/10/2018/पुणे

Asst. Charity Commissioner Pune

## परिशिष्ट—क

## ''श्रीराममुक्ता एज्युकेशन सोसायटी''

सहाय्यक संस्था निबंधक पुणे विभाग, पुणे

१)संस्थेचे नाव :— ''श्रीराममुक्ता एज्युकेशन सोसायटी''

२)संस्थेचा पत्ता :— व्दारा. श्री. रोहिदास रामभाऊ धावडे स.नं. १५ रामभाऊ धावडे चाळ, विठ्ठल मंदिराजवळ, उत्तम नगर, पुणे ४११०२३

या संस्थेची नियमावली पुढील प्रमाणे

१. नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या:—

अ) संस्था :—संस्था म्हणजे नोंदणी अधिनियम १८६०व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदविण्यात येणारी संस्था.

ब) नियम :-- संस्था नोंदणी अधिनियम १८६०,मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये संस्था नोदविण्यात येताना कार्यकारी मंडळाने तयार केलेले नियम व नियमावली.

क) कार्यकारी मंडळ :—संस्थेचे कार्यकारी मडळ म्हणजे संस्थेच्या नियम व नियमावलीनुसार संस्था स्थापनेच्या वेळी व नंतर संस्थेच्या सर्वसाधारण सभेत निवडून येणारे मंडळ किंवा विश्वस्त की,ज्यांचेवर संस्थेची जबाबदारी व व्यवस्था सोपविली असे मंडळ अशा कार्यकारी मंडळात अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार व सभासद/सदस्य असे पदाधिकारी असतील.

२. कार्यक्षेत्र :— संस्थेचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्र राज्य असे राहील.

३. हिशोबाचे वर्ष :—संस्थेचे हिशोबाचे वर्ष हे १ एप्रिल रोजी सुरू होवून प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्चला समाप्त होईल.

४. सभासदत्व व त्यांची नोंदणीची पध्दत:—संस्थेचे ध्येय,उद्देश नियमावली मान्य असणाया १८ वर्षावरील कोणत्याही भारतीय स्त्री/पुरूषास सभासद करून घेता येईल. सभासद होण्यास कार्यकारी मंडळाने तयार केलेल्या अर्जाप्रमाणे अर्ज भरून विहीत केलेली फी/वर्गणी भरून सभासदत्व प्राप्त करून घेता येईल.संस्थेच्या सभासदत्वासाठी अर्ज प्राप्त झाल्यांनतर त्यांची योग्य छाननी करण्यात येईल,कार्यकारी मंडळाने

| | | |
|---|---|---|
| श्री. रोहिदास धावडे | सौ. आशा धावडे | श्री. रोहन धावडे |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

PRESIDENT
SHRI RAMMUKTA EDUCATION SOCIETY
Uttamnagar, Pune-411 023.

शिक्षणाधिकारी(माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

(9)

बहुमताने त्यास मान्यत दिल्यावर अध्यक्षांचे मंजूरी स्वाक्षरी नंतर योग्य छाननी करण्यात येईल.अशा रितीने नियमावलीतील नियमांच्या अधिन राहून सभासदत्व प्राप्त झाल्यनंतर त्यांचे नाव संस्थेच्या सभासद नोंदवही मध्ये नोंदविण्यात येईल.कार्यकारी मंडळाचा निर्णय सर्व मान्य राहील. ठरावान्वये या संस्था स्थापनेच्या वेळी त्या दिनांकास असणारे सर्व सदस्य हे आपोआपच संस्थेचे कायमस्वरूपी आजीव सभासद समजले जातील. नियमावलीतील नियम सदर कमांक ४व६ मधील तरतुदींच्या नुसार मतदानाचा व निवडणुकीला उभे राहण्याचा अधिकार सभासदाला असेल.एकदा अर्ज नाकारल्यावर त्या व्यक्तीस पुन्हा २ महिने कालावधी पर्यंत अथवा कार्यकरिणीच्या पुढील बैठकीच्या दिनांका पर्यंत अर्ज करता येणार नाही.मात्र अर्जदाराने पुन्हा अर्ज केल्यास त्याच्या अर्जास ,प्राधान्य देण्यात येईल.

५. **सभासदत्व रद्द होणे :—**

पुढील एक किंवा अनेक कारणांनी सभासदत्व रद्द होईल.

नियमानुसार मासिक/वार्षिक वर्गणी न दिल्यास किंवा सलग ३ महिने फी न भरल्यास सभासदत्व रद्द करणेत येईल.

सभासदाची वर्तणूक वागणूक संस्थेच्या कार्यास घातक ठरत असेल,ज्ञापन/ नियमावलीतील तरतुदींचे उल्लघंन करित असेल,निर्धुन कृत्य केल्यास, संस्थेस हानी/नुकसान होईल,अप्रतिष्ठा दुर्लौकिक होण्यास कारणीभुत ठरेल.असे कृत्य केल्यास अशा सभासदाचे सभासदत्व रद्द करण्यात येईल. अफरातफर अथवा संस्थेची फसवणूक केल्यास संस्थेविषयी अपप्रचार केल्यास अथवा गैरकृत्य केल्यास अशा सभासदाचे सभासदत्व रद्द करण्यात येईल.फौजदारी खटल्यात दोषी ठरवून कायदेशीर शिक्षेस पात्र ठरल्यास कायदयानुसार दिवाळखोर सिध्द झाल्यास सभासदत्व रद्द करण्यात येईल.संस्थेचे काम करण्यास कायदेशीर अपात्र ठरविले असल्यास लेखी स्वरूपात राजीनामा दिलेला असेल आणि राजीनामा मंजूर झाला असेल तर सभासदत्व रद्द करण्यात येईल.वैदयकीय,शारिरीक,मानसिक दृष्टया संस्थेचे काम

| | | |
|---|---|---|
| श्री. रोहिदास धावडे<br>अध्यक्ष | सौ. आशा धावडे<br>उपाध्यक्ष | श्री. रोहन धावडे<br>सचिव |

PRESIDENT
SHRI RAMMUKTA EDUCATION SOCIETY
Uttamnagar, Pune-411 023.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

(71)

करण्यास असमर्थ असल्यास मृत्यु अथवा अन्य कारणाने सभासदत्व रद्द करण्यात येईल.

सभासदत्व रद्द करण्याबाबतचे निर्णय कार्यकारी मंडळ बहुमताने घेईल.

६. सभासदाचे प्रकार:—नियमावलीतील नियम क्र. ४ च्या अधीन राहून सभासदाचे प्रकार खालीलप्रमाणे राहतील. संस्थेच्या पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांना अजिव सदस्याचा दर्जा देण्याचे व त्यांची वर्गणी फी. १००१/—प्रत्येकी जमा करण्यात येईल.

७. अजिव सभासद:—संस्थेस एक रक्कमी रूपये ५०००/— अक्षरी रू.पाच हजार फक्त देणा—या वय वर्षे १८ वरील भारतीय व्यक्तीस अर्ज केल्यानुसार संस्थेचा अजिव सभासद कायमस्वरूपी सभासद म्हणून संबोधले जाईल.सदर वर्गणी भरल्यानंतर त्या व्यक्तीच्या अर्जास कार्यकारी मंडळाने मंजुरी दिल्यानंतर पैसे भरल्याचे दिनांकापासून त्या व्यक्तीस अजिव सभासदाचा दर्जा प्राप्त होईल. ठरावान्वये व संस्था स्थापनेच्या वेळी त्या दिनांकास असणारे सर्व सदस्य हे आपोआपच संस्थेचे कायमस्वरूपी अजिव सभासद समजले जातील.तसेच आजिव सभासदांना मतदानाचा अधिकार असेल. तसेचनिवडणुकीला उभे राहण्याचा अधिकार असेल.

सर्वसाधारण सभासद :— संस्थेकडे वार्षिक कालावधीसाठी वर्गणी रूपये १२००/— वार्षिक भरणा—या १८ वर्षे वरील भारतीय व्यक्तीस अर्ज केल्यानुसार संस्थेचा सर्वसाधारण सभासद म्हणून संबोधले जाईल. सदर वर्गणी भरल्यानंतर त्या व्यक्तीच्या अर्जास कार्यकारी मंडळाने मंजूरी दिल्यानंतरच पैसे भरल्याचे दिनांकापासून त्या व्यक्तीस सर्वसाधारण सभासदचा दर्जा प्राप्त होईल.सर्वसाधारण सभासदाला त्याच्या सभासदत्वचा कालावधीतच फक्त मतदानाचा अधिकार असेल. वार्षिक वर्गणी देण्या—या सभासदांना त्याच्या सभासदत्वाच्या कालावधीतच मतदानाचा अधिकार असेल.

| | | |
|---|---|---|
| श्री. रोहिदास धावडे | सौ. आशा धावडे | श्री. रोहन धावडे |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

PRESIDENT
SHRI RAMMUKTA EDUCATION SOCIETY
Uttamnagar, Pune-411 023.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

72

Asst. Charity Commissioner Pune

मात्र ज्या सभासदांचे संपूर्ण वर्गणी आलेली नाहीअशा सभासदांना मत देण्याचा अधिकार राहणार नाही तसेच सर्वसाधारण सभासदाला निवडणूकीला उभे राहण्याचा अधिकार नसेल.

**हितचिंतक सभासद;—** संस्थेचे कामकाज व योजनेचे विस्ताराचे दृष्टीने एकरक्कमी रूपये १०००/— पर्यंत देणगी देणारी व्यक्ती ही हितचिंतक सभासद होईल.मात्र त्यास संस्थेच्या होणा—या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मतदानाचा व निवडणुकीला उभे राहण्याचा हक्क राहणार नाही.

८. **वार्षिक सर्वसाधारण सभा व तिचे कार्य आणि अधिकार;—**

**सदर संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्वश्रेष्ट व अंतिम निर्णय देणारी सभा समजली जाईल.सदर सभा दरवर्षीएकदा घेण्यात येईल.या सभेत पुढीलप्रमाणे कामे केली जातील.**

१. मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.मान्यता देणे व कार्यकारी मंडळाने सादर केलेला जमा खर्च ताळेबंद अहवाल वाचून दाखविणे मागील सभेत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे.

२. कार्यकारी मंडळाची निवड करणे, निवडणुकीचे निकाल जाहीर करणे. पुढील वित्तीय वर्षासाठी चार्टर्ड अकांटंट अथवा ऑडिटर यांची नियुक्ती करणे. संस्थेचे उद्देश नियम व नियमावली दूरूस्ती असल्यास त्याला मान्यता देणे. अध्यक्षांच्या सुचनेवरून इतर कामकाज करणे.

३. संस्थेच्या उददेश पुर्तीसाठी चर्चा करणे व नियम घेणे संस्थेला आलेल्या देणग्याचा व वर्गणीचा हिशोब ठेवणे त्यांच्या पावत्या देणे,संस्थेच्या सर्व बाबतीत वार्षिक सर्व साधारण सभेचा निर्णय अंतिम समजण्यात येईल.

४. संस्थेच्या नियमाप्रमाणे सभासदत्व प्राप्त झालेल्या व मतदानाचा अधिकार असलेल्या सर्व सभासदांनी मिळून वार्षिक सर्वसाधारण सभा होईल.

५. कोणत्याही परिस्थितीत संस्थेचे आर्थिक वर्ष संपल्यापासून ६ महिन्यात कार्यकारी मंडळाने अशी सर्व साधारण सभा बोलावील पाहीजे.

६. जर कार्यकारी मंडळाने ती बोलविली नाही तर संस्थेचे ३/५ सभासद एकत्र येउन अशी सभा घेण्याबाबत योग्य तो निर्णय घेउ शकतील

श्री. रोहिदास धावडे
अध्यक्ष
PRESIDENT
SHRI RAMMUKTA EDUCATION SOCIETY
Uttamnagar, Pune-411 023.

सौ. आशा धावडे
उपाध्यक्ष

श्री. रोहन धावडे
सचिव

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

(12)

(73)

आणि त्यानुसार होणा–या सभेत संमत झालेले सर्व ठराव हे कार्यकारी मंडळावर बंधनकारक राहतील.

९. सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या :–

संस्थेचे कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या दिवशी वेळी व ठिकाणी सेक्रेटरी हे अध्यक्षांच्या पुर्व परवानगीने लेखी सुचना काढून वार्षिक सर्वसाधरण सभा बोलावतील.सदर सूचना सभेच्या दिनांकापूर्वी १५ दिवस 'अगोदर नोटीस बोर्डावर लावली पाहीजे.अथवा सभासदांच्या घरी समक्ष दिली गेली पाहीजे व सदर सुचना मिळाल्याची सही नोंद पुस्तकात घेण्यात येईल.सदर सुचनेत सभेचे विषय सभेचे ठिकाण तारिख व वेळ यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

सदर सभेची गणसंख्या एकुण सभासदांच्या ३/५ इतकी राहील.ठरलेल्या वेळेत गणपूर्ती झाली नसल्यास सभा त्याच ठिकाणी त्याच विषयावर अर्ध्या तासांनंतर घेण्यात येईल.त्यास गणपुर्तीची आवश्यकता नाही व तिचे सर्व कामकाज कायदेशीर राहील.परंतु तशी सुचना ही वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटीसीमध्ये नमूद करणे आवश्यक आहे.

१०. विशेष सर्वसाधारण सभा व तिचे कार्य :–

विशेष सर्व साधारण सभा आवश्यकतेनुसार केव्हाही घेता येईल.जी कार्य वार्षिक सर्वसाधरण सभा करू शकते अशी सर्व काही कार्ये करण्याचा अधिकार विशेष सर्वसाधारण सभेला असेल संस्थेच्या सभासदांची विशेष सर्व साधारण सभा अध्यक्षांच्या संमतीने कार्यकारी मंडळ अयोजित करेल किंवा सभासद संस्थेच्या ३/५ सभासदांनी कार्यकारी मंडळाकडील लेखी मागणी केल्यास कार्यकारी मंडळाने तरी मागणी मिळालेपासून तीस दिवसाचे आत विशेष सर्वसाधारण

सभा बोलावतील आयोजित करतील.विशेष सर्वसाधारण सभेसाठी मतदानाचा हक्क असलेल्या एकुण ३/५ सभासदांची गणसंख्या असेल सुचनेमध्ये वरील प्रमाणे माहिती तसेच सभेपुढील विषय नमूद करावेत.पुरेशी गणसंख्या न जमल्यास त्याच विषयाच्या सदर तहकूब

| | | |
|---|---|---|
| श्री. रोहिदास धावडे | सौ. आशा धावडे | श्री. रोहन धावडे |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

PRESIDENT
SHRI RAMMUKTA EDUCATION SOCIETY
Uttamnagar, Pune-411 023.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

Asst. Charity Commissioner, Pune

74

(13)

Asst. Charity Commissioner Pune

स्थगित सभेला पुन्हा गणसंख्येचे बंधन राहणार नाही.पुरेश्या गणसंख्ये अभावी स्थगित सभा पुन्हा अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी घेण्यात येईल.मात्र अशा सभेत घेण्यात आलेल्या निर्णय सर्वावर बंधनकारक असेल.

११. संस्थेचे कार्यकारी मंडळ व तिचे पदाधिकारी यांची रचना:—

सदरहू संस्थेचे कार्यकारी मंडळ हे कमीत कमी ९ व जास्तीत जास्त ११ सभासदांचे राहील.त्यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार, व सभासद/सदस्य हे कार्यकारी सदस्य असतील.

१२. **कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणुकीची पध्दत:—**

संस्थेच्या कार्यकारी मंडळाचा कार्यकाल हा ५ वर्षाचा राहील. दर ५ वर्षानी संस्थेच्या एकुण सभासदाची यादी तयार करून वार्षिक सर्वसाधारण सभा बोलविण्यात येईल. सदर सभेमध्ये नविन कार्यकारी मंडळाची निवड ही लोकशाही पध्दतीने किंवा बहुमताने करण्यात येईल.

निवडणुकीची कार्यवाही ही संस्थेच्या जुन्या कार्यकारी मंडळाकडून केली जाईल.जर आवश्यकता वाटल्यास नवीन कार्यकारी मंडळाची निवड करण्याकरिता योग्य त्या व्यक्तीची निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येईल व तेच निवडणूक निकाल जाहीर करतील.

१३. कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे:—

१ अध्यक्ष:— संस्थेचे व्यवस्थेकरिता प्रत्येक सभेचे अध्यक्षस्थान स्विकारतील. व्यवस्थेचे कारभारानी व सध्या अस्तित्वात असलेले किंवा नवीन निर्माण झालेल्या मालमत्तेची व्यवस्था पाहणे,देखरेख करणे व संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सभेत झालेल्या ठरावाप्रमाणे काम करणे, संस्थेच्या विविध कायदेशीर कागदपत्रावर सहया करणे, जर एखादया सभेमध्ये समान मतविभागणी झाल्यास निर्णयक जादा मत देणे संस्थेच्या एकुण कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवणे व संस्थेच्या कामकाजाबाबत असलेले सर्व स्वरूपाचे निर्णय घेणे.

| श्री. रोहिदास धावडे | सौ. आशा धावडे | श्री रोहन धावडे |
| --- | --- | --- |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

PRESIDENT
SHRI RAMMUKTA EDUCATION SOCI
Uttamnagar, Pune-411 023.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

Asst. Charity Commissioner Pune

२ उपाध्यक्ष : अध्यक्ष यांच्या गैरहजेरीत अध्यक्षांची सर्व कामकाज पाहणे.

३ सचिव:—प्रत्येक सभेच्या सुचना काढणे,वृत्तांत लिहणे, ऑफिस रेकॉर्ड ठेवणे,पत्रव्यवहार करणे,संस्थेची व्यवस्था व नवीन निर्माण होणारे संस्थेचे दप्तर सर्व कागदपत्र व्यवस्थीत ठेवतील तसेच संस्थेच्या कार्यकारिणीची आता अंमलात आणतील. कार्यवाही करतील, तसेच प्रमुख व्यवस्थापन मंडळाने स्मरणात आणून त्यांचेशी बोलणी करून विषयावर सभा बोलावतील. संस्थेचे व्यवस्थेकरिता निधी गोळा करून त्यांच्या पावत्या देणे,निरनिराळया मंडळाचे बैठकीत सादर करणे, त्यास मंजूरी घेणे. पत्रव्यवहार करणे, तक्रारीचे निवारण करणे. संस्थेचे सुरक्षितेचे दृष्टीने आवश्यक ती कोर्ट कचेरीची कामे करणे, त्याचा निर्णय विचार विनिमय कार्यकारी मंडळाचे सभेत मांडणे इ.कामे करणे.

४ खजिनदार:— खजिनदार यांनी अध्यक्षांच्या आदेशांचे पालन करावे,वार्षिक हिशोब पत्रके व इतर महत्वाची विवरणपत्रके तयार करणे व संबधित विभागांकडे विहित वेळेत सादर करणे,संस्थेच्या खर्चाची बिले मंजूर करणे, पावत्यांवर सहया करणे,मालमत्तेची देखरेख करणे मोठया खर्चाची बिले सेक्रेटरी यांच्या संयुक्त सहीने मंजूर करणे संस्थेच्या अर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे,संस्थेच्या जमा खर्चाचे हिशोब ठेवणे व त्या संबधीच्या नोंदवहया सुस्थितीत ठेवणे,संस्थेच्या नावे जमा झालेल्या रक्कमेपैकी जास्तीत जास्त रक्कम त्याच दिवशी सायंकाळ पर्यंत अथवा दुसरे दिवशी सकाळी संस्थेच्या नावे असलेल्या बँक खात्यात जमा करावी खजीनदाराने सभासदांचीसूची तयार करून त्यांचे वर्गणीचा हिशोब व्यवस्थीत व अदयावत ठेवावा,संस्थेच्या नावे वेळोवेळी

येणा—या कोणत्याही रक्कमा,वर्गण्या देणग्या,प्रवेश शुल्क,निधी,चिजवस्तु वगैरे स्विकाराव्यात आणि त्याबाबत छापील अनुक्रमांकित, संस्थेचा नोंदणी क्रमांक व कार्यालयाचा पत्ता असलेलया पावत्या दयाव्यात,लेखापरिक्षकांनी काढलेल्या त्रुटींची त्वरीत पुर्तता करणे.

५ सदस्य/सभासद:— संस्थेच्या कामकाजात मदत करणे.

| | | |
|---|---|---|
| श्री. रोहिदास धावडे | सौ. आशा धावडे | श्री. रोहन धावडे |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

PRESIDENT
SHRI RAMMUKTA EDUCATION SOC
Uttamnagar, Pune-411 023.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

Asst. Charity Commissioner

१४. कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा:—

कार्यकारी मंडळाची सभा सहा महिन्यात एकदा आयोजित करण्यात येईल.कार्यकारी मंडळाच्या संमती शिवाय/परवानगीशिवाय ठोस कारण नसताना एखादा सभासद सतत सभांना गैरहजर राहिल्यास विहीत सुचना देउन त्यांचे कार्यकारी मंडळाचे सभासदत्व रद्द केले जाउ शकते. कार्यकारी मंडळाची सभा नियम नियमावली नुसार घेत नसल्यास कार्यकारी मंडळातील २/३सभासदांनी स्वत: सहीनिशी अध्यक्ष/सेक्रेटरी यांचेकडे अर्ज करून सभा भरविण्याची मागणी केली पाहीजे अथवा संस्थेच्या एकुण सभासद संस्थेच्या २/३ सभासदांनी लेखी मागणी केल्यास अध्यक्षांनी सदर मागणी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आंत कार्यकारी मंडळाची सभा घ्यावी असे बंधन राहील.अध्यक्षांनी अशी सभा बोलावली नाही तर सेक्रेटरी यांचकडे पुन्हा अर्ज केल्यास सेक्रेटरी यांनी सदर सभा आयोजित करावी या सभेला कार्यकारी मंडळाच्या सभेचे पुर्ण अधिकार असतील.सदर सभांच्या सुचनेमध्ये मागणीची सभा भरवून मागणी अर्जाप्रमाणे त्यावर निर्णय घेतला पाहीजे.

१५. कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभेची सूचना व गणसंख्या:—

कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांना कार्यकारी मंडळाच्या सभेची लेखी सुचना सेक्रेटरी यांनी कमीत कमी पंधरा दिवस अगोदर दयावी. सभेची सुचना व अजेंडा रजिस्टार पोस्टाने किंवा नोंद घेउन हस्तेदेय पाठविले जाउ शकतात.तसेच सुचना कार्यालयाचे दर्शनी भागातील सुचना फलकावर लावण्यात येईल.सभेच्या सुचनांमध्ये तारिख,वेळ,ठिकाण नमुद असेल.कार्यकारी मंडळाच्या सभेत गणसंख्या ३/५ इतकी असेल.गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास सदरील सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर घेण्यात येईल.अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही तसेच सभेतील निर्णय बहुमताने घेण्यात येईल.

श्री. रोहिदास धावडे
अध्यक्ष

सौ.एआर धावडे
सौ. आशा धावडे
उपाध्यक्ष

श्री. रोहन धावडे
सचिव

PRESIDENT
SHRI RAMMUKTA EDUCATION SOCIETY
Uttamnagar, Pune-411 023.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

(77)

(16)

Asst. Charity Commissioner Pune

१६. कार्यकारी मंडळाचे निवडणुकीचे नियम;–

सदर कार्यकारी मंडळाचा कार्यकाल पाच वर्षापर्यंत राहील. नविन कार्यकारी मंडळाची निवड ही दर पाच वर्षानी संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये लोकशाही पध्दतीने किंवा बहुमताने करण्यात येईल. त्याकरिता जुन्या कार्यकारी मंडळाकडून निवडणूकी बाबत नियम तयार केले जातीलव त्या अन्वये नवीन कार्यकारी मंडळाची निवड करण्यात येईल.ज्या वर्षी निवडणूक असेल त्या वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटीसीमध्ये तसा स्पष्ट उल्लेख करण्यात येईल.

१७. कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्याबाबत;–

संस्थेच्या नियमावलीतील नमुद केलेल्या कारणावरून कार्यकारी मंडळातील रिक्त झाल्याची जागा भरावयाची असल्यास त्या बाबत कार्यकारी मंडळातील सभेत त्याची निवड करण्यात येईल.त्याबाबत सदर नियमावलीतील नमुद केलेले नियम क्र.४,६,१० व ११ विचारात घेण्यात येतील व नियोजित पदसंख्या पूर्ण करून घेण्यात येईल.

१८. कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये;–

संस्थेच्या सर्व विदयमान स्थावर जंगम मिळकत व पुढे वेळोवेळी अन्य मार्गाने मिळालेली मिळकत संस्थेच्या वतीने कार्यकारी मंडळाच्या ताब्यात राहील.संस्थेच्या स्थावर मिळकतीपासून मिळणारे भाडे व उत्पन्न वसूल करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

संस्थेच्या ध्येय व उद्देश साध्य करण्यासाठी वा संस्थेचे कार्य चालविण्याकरिता मंजूर केलेल्या रक्कमाचा विनियोग करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाला राहील.त्यावर नियंत्रण ठेवणे,संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणे,नोकर वर्गाची नेमणूक करणे त्यांचे पगार निश्चित करणे,त्यांना निवृत्त करणे संस्थेच्या देण्या घेण्याचे व्यवहार पाहणे, नविन उपसमित्या नेमणे,हिशोब तपासणीसाकडून जमा खर्च

| श्री. रोहिदास धावडे | सौ. आशा धावडे | श्री. रोहन धावडे |
| --- | --- | --- |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

PRESIDENT
RAMMUKTA EDUCATION SOCIETY
Uttamnagar, Pune-411 023.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पणे

78

Asst. Charity Commissioner Pune

व ताळेबंद पत्रक तयार करून अहवाल वार्षिक सर्वसाधारण सभेत सादर करणे.संस्थेचे हिशोब हे संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये ठेवणे त्याचे परिक्षण चार्टर्ड अकाउंटट अथवा ऑडिटर याच्याकडून करून घेवून विहित नमुन्यामध्ये सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयात दर वर्षी आर्थिक वर्ष संपल्यापासून ९० दिवसांच्या आत सादर करणे,संस्थेच्या पुढील कार्याची रूपरेषा अंदाजपत्रक तयार करून वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे संस्थेच्या सभासदत्वासाठी आलेल्या अर्जाचा विचार करून त्यावर निर्णय घेणे तसेच संस्थेच्या हिताविरूध्द अगर ध्येय धोरणविरूध्द कार्य करणारा सभासदाविरूध्द योग्य ता कार्यवाही करणे व आवश्यक वाटल्यास त्याचे सभासदत्व रद्द करणे.

संस्थेच्या वतीने जागा संपादन करून त्यावर सर्व सुविधानियुक्त अशी इमारत तयार करणे व त्याची चांगल्या प्रकारे देखरेख व व्यवस्था पाहणे.संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूर केलेले ठराव,आदेश व धोरण विषयक गोष्टी अंमलात आणणे,संस्थेने नेमलेल्या व्यक्तीची संबंधित माहिती व विवरणे हे संस्था नोंदणी अधिनियम १८६० च्या नियम ८ अन्वये व अनुसूचित २ च्या नमुन्यात सहायक धर्मादाय आयुक्त यंच्या कार्यालयात पाठविणे.संस्थेच्या उददेशपुर्तीसाठी विविध शाखांना मान्यता देणे काढून घेणे,नवीन शाखा सुरू करणे–बंद करणे आणि संस्थेच्या हितार्थ विविध निर्णय घेणे.

१९. संस्थेचा निधी मिळकत व विनियोग;–

संस्थेच्या उददेश पुर्तीसाठी सभासद वर्गणी,देणग्या,खाजगी व्यक्ती,शासकीय व निमशासकीय संस्था यांच्याकडून मिळणारे अनुदान इ. रक्कमा या संस्थेच्या निधी समजण्यात येईल.तसेच देणगी रूपाने,करार,खरेदी व अन्य मार्गाने मिळणारी सर्व रक्कम संस्थेच्या उददेश पूर्तीसाठी व व्यवस्थापकीय खर्चासाठी वापरली जाईल.

| | | |
|---|---|---|
| श्री. रोहिदास धावडे | सौ. आशा धावडे | श्री. रोहन धावडे |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

PRESIDENT
SHRI RAMMUKTA EDUCATION SOCIETY
Uttamnagar, Pune-411 023.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

(18)

79

२०. उद्दीष्ट निहाय खर्चाची तरतूद टक्केवारी प्रमाणे;—

संस्थेच्या एकुण उत्पन्नातून संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी ८० टक्के रक्कम खर्च करण्यात येईल व राहीलेली २० टक्के रक्कम ही संस्थेच्या दैनंदिन कामकाजासाठी वापरली जाईल. आवश्यकतेनुसार सदर खर्चाच्या प्रमाणात कार्यकारी मंडळाच्या ठरावा अन्वये बहुमताने बदल केला जावू शकेल.मात्र ठरावामध्ये या बाबतची ठोस कारणे नमुद करावी लागतील.

२१. कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतूद;—

संस्थेस आवश्यक वाटल्यास कोणत्याही व्यक्ती/वित्तीय संस्थेकडून कायदेशीर मार्गाने कर्ज घेता येईल. अगर ठेवी घेता येईल.मात्र त्याकरिता सर्वसाधारण सभेमध्ये बहुमताने ठराव मंजूर करावा लागेल. त्याबाबत कार्यकारी मंडळास मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३६ व ३५ प्रमाणे मे.धर्मादाय सह—आयुक्त,पुणे यांची रितसर परवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच देणगी अथवा बिनव्याजी ठेवी स्वीकारता येतील.

२२. स्थावर मालमत्ता खरेदी--विक्री करणेबाबतची तरतूद;—

संस्थेस योग्य वाटल्यास स्थावर व जंगम मिळकत खरेदी करता येईल.मात्र स्थावर मिळकतची विक्री करायची असल्यास अथवा गहाण,तबदिल करायची असल्यास मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था १९५० चे कलम ३६ अन्वये मे.धर्मादाय सह—आयुक्त,यांची रितसर परवानगी घेणे आवश्यक आहे.

२३. बँक खाते;—

संस्थेच्या कारभाराचे दैनंदिन हिशोब व व्यवहार बँकेमार्फत केला जाईल.त्याकरिता कोणत्याही राष्ट्रीयकृत बँक/सहकारी बँक व इतर शासकीय मान्यता प्राप्त वित्तीय संस्था,पतपेढी यामध्ये संस्थेच्या नावे खाते उघडून बँकेमध्ये संस्थेच्या ठेवी,वर्गणी,देणगी इ.रक्कमा ठेवण्यात येतील.त्या रक्कमा काढण्याचा अधिकार संयुक्तपणे संस्थेचे अध्यक्ष

| | | |
|---|---|---|
| श्री. रोहिदास धावडे | सौ. आशा धावड | श्री. रोहन धावडे |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

PRESIDENT
RI RAMMUKTA EDUCATION SOCIETY
Uttamnagar, Pune 411 023

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

(१९)

(८०)

व सचिव यांना राहतील जर या दोघांपैकी कोण एक जण उपस्थित नसेल तर खजिनदार यांना सहीचा अधिकार राहील. जर भविष्यात बँक खाते चालविण्याबाबत फेरबदल करण्याचा अधिकार हा संस्थेच्या कार्यकारी मंडळास राहील व त्या अन्वयं कार्यकारी मंडळाच्या सभेमध्ये ठराव संमत करून बँक खाते चालविण्याबाबत अन्या व्यक्तीस अधिकार प्रदान करतील.संस्थेचे शक्य तितके व्यवहार हे धनादेशाव्दारेच करण्याचे प्रयत्न करण्यात येईल.

२४. **सभासदांची यादी ठवण्याची पध्दत;–**

संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १५ अनुसार संस्थेतील जे सभासद असतील त्यांची यादी संस्था नोंदणी (महाराष्ट्र) सन १९७१ च्या नियमामध्ये उल्लेख केलेली अनुसूची ६ चे स्वतंत्र नमूनं अर्जदाराचे सहीनिशी असावे,त्याबाबत नियमावलीची तरतूद केलेली असावी. सभासदांची यादी १८६० चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम ४ नुसार व सन १९७१ च्या संस्था नोंदणी (महाराष्ट्र)नियमांतील नियम क.८ नुसार दर वर्षी संस्थेमध्ये नोकरीस लावलेल्या व्यक्तांच्या नोकरी संबधी अटीचे विवरण संबंधित अनुसूची ७ च्या नमुन्यात मा.सहा.संस्था निबंधक यांच्या कार्यालयास पाठवावी लागेल.

२५. नियम व नियमावलीतील बदल करण्याची तरतूद;–

कार्यकारी मंडळाने अगर सभासदांनी चालू नियम व नियमावलीमध्ये दुरूस्ती,फेरबदल,वाढ घट विस्तार अथवा काही बदल करावयाचा असल्यास त्यास वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या तीन पंचमांश बहुमताने मंजूर करण्यात येईल.मात्र घटना दुरूस्ती मसुदा प्रत्येक सभासदाला नोटीसी बरोबर पाठविला जाईल.वार्षिक सर्वसाधारण मंजूर केलेला बदल कार्यकारी मंडळाच्या प्रतिनिधीना विहीत नमुन्यात बदल अहवाल मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयात मंजुरीसाठी सादर केला पाहीजे.त्यांच्या मंजुरीनंतरच हा बदल अहवाल कायदेशीर समजला जाईल आणि सदर बदल

सौ. ए आर धावडे

| | | |
|---|---|---|
| श्री. रोहिदास धावडे | सौ. आशा धावडे | श्री. रोहन धावडे |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

PRESIDENT
HRI RAMMUKTA EDUCATION SOCIET
Uttamnagar, Pune-411 023.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

Asst. Charity Commissioner
Pune

(२८)

(81)

अहवाल हा आयकर कायदा अन्वये आयकर आयुक्त पुणे यांच्या कार्यालयात दाखल केला जाईल.त्याबाबतची सर्व कायदेशीर पुर्तता ही संस्था नोंदणी अधिनियम सन १८६० च्या कलम १२ व १२ अ प्रमाणे करण्यात येईल.

२६. संस्थेच्या नावात व उददेशांत बदल करण्याबाबतीत तरतूद:—

संस्थेचे नाव किंवा उददेश यांत बदल करावयाचा असेल अथवा दोन अधिक संस्थेचे विलीनीकरण करावयाचे असल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० मधील कलम १२ अथवा १२अ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.वार्षिक सर्वसाधारण सभेने ३/५ बहुमताने मंजूर केलेला बदल कार्यकारी मंडळाच्या प्रतिनिधीना विहीत नमुन्यात बदल अहवाल मा.सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयात मंजुरीसाठी सादर केला पाहीजे.त्यांच्या मंजूरीनंतरच हा बदल अहवाल कायदेशीर समजला जाईल आणि बदल अहवाल हा आयकर कायदा अन्वये आयकर आयुक्त पुणे यांच्या कार्यालयात दाखल केलस जाईल.

२७. विर्सजन:—

संस्थेचे विसर्जन करावयाचे असल्यास संस्था नोंदणी अधिनियम १८६० मधील कलम १३ व १४ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. संस्थेच्या विर्सजनाप्रसंगी संस्थेकडील असलेली स्थावर,जंगम मालमत्ता आणि रोकड या सर्व संस्थेच्या सभासदांच्या बहुमताने सदर संस्थेच्या उददेशाप्रमाणे कार्य करणारी आणि जी संस्था आयकर कायदा १९६१ या कायदयाच्या कलम १२ अ व ८० ग नुसार कार्यरत असेल अशा संस्थेस हस्तांतर करण्यात येईल. सर्व कायदेशीर सोपस्कर पूर्ण झाल्यानंतर त्याप्रमाणे संस्थेचे कार्य बंद करता येईल. अथवा संस्था विर्सजीत करता येईल.

| | | |
|---|---|---|
| श्री. रोहिदास धावडे | सौ. आशा धावडे | श्री. रोहन धावडे |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

PRESIDENT
AMMUKTA EDUCATION SOCIETY
amnagar, Pune-411 023.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

Mar. ACC-II
28.12.23

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.

प्राप्त
28.12.2023
बदल अर्ज छाननी लिपिक
सा. न्या. नों. का. पुणे,
विभाग पुणे

परिशिष्ट ३

नियम १३(१)

सह धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्या कार्यालयात ठेवण्यात आलेल्या नोंद पुस्तकात न्यासा संदर्भात केलेल्य नोंदीतील झालेल्या बदलाबाबत अथवा इष्ट करावयाच्या बदलाबाबतचा बदल अर्ज.

*********************************************************************

- न्यासाचे नाव- **"श्रीराममुक्ता एज्युकेशन सोसायटी"**

**न्यासाचा पत्ता- सर्व्हे नं.१५, रामभाऊ धावडे चाळ, विठ्ठल मंदिराजवळ, उत्तमनगर, पुणे- ४११०२३**

**न्यासाचा नोंदणी क्र.-एफ-५२०१४/पुणे** दि.०९/०१/२०१९

महाराष्ट्र/१५७४/२०१८/पुणे दि.०५/१०/२०१८

*********************************************************************

| बदलाचे स्वरूप | बदलाचे कारण | शेरा |
|---|---|---|
| कृपया खालील व्यक्तीचे नाव परिशिष्ट -१ वरून दि.०५/१०/२०१८ ते दि.०४/१०/२०२३ पर्यंत कमी करण्यात यावीत.<br><br>१) श्री. रोहिदास रामभाऊ धावडे - अध्यक्ष<br>सर्व्हे नं.१५, रामभाऊ धावडे चाळ, विठ्ठल मंदिराजवळ, उत्तमनगर, पुणे- ४११०२३<br><br>२) सौ. आशा रोहिदास धावडे - उपाध्यक्ष<br>सर्व्हे नं.१५, रामभाऊ धावडे चाळ, विठ्ठल मंदिराजवळ, उत्तमनगर, पुणे- ४११०२३<br><br>३) श्री. रोहन रोहिदास धावडे - सचिव<br>सर्व्हे नं.१५, रामभाऊ धावडे चाळ, विठ्ठल मंदिराजवळ, उत्तमनगर, पुणे- ४११०२३<br><br>PRESIDENT<br>SHRI RAMMUKTA EDUCATION SOCIETY<br>Uttamnagar, Pune-411 023.<br><br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक)<br>पुणे जिल्हा परिषद पुणे | दि.०४/१०/२०२३ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा होवून दि.०५/१०/२०२३ ते दिनांक ०४/१०/२०२८ या कार्यकाळासाठी कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली. | १) नोंदणी प्रमाणपत्र<br>२) घटनेची प्रत<br>३) ना-हरकतपत्रे<br>४) संमतीपत्रे<br>५) सभेची नोटीस प्रत<br>६) नोटीस पोहोच प्रत<br>७) सभेचा ठराव प्रत<br>८) सभेला उपस्थितांची यादी<br>९) वकीलपत्र |

४) सौ. अश्विनी प्रणय काटे - खजिनदार
बिल्डींग नं.४, फ्लॅट नं.४०२, एस. व्ही. रोड, प्रेम नगर,
बोरीवली वेस्ट, मुंबई-४०००९२

५) श्री. दीपक गजानन गव्हाणे - सदस्य
गव्हाणे आळी, शिवाजी पुतळ्याजवळ, पिंपरी गाव, पुणे-
४११०१७

६) श्री. ऋषिकेश भानुदास कलाटे - सदस्य
सर्व्हे नं. १४७/२/३, रामचंद निवास, वाकडकर वस्ती,
मारुंजी, वाकड, पुणे- ४११०५७

७) कु. स्नेहल रोहिदास धावडे- सदस्य
सर्व्हे नं.१५, रामभाऊ धावडे चाळ, विठ्ठल मंदिराजवळ,
उत्तमनगर, पुणे- ४११०२३

८) सौ. कावेरी योगेश कटके- सदस्य
घर नं. ६३८, एन.डी.ए. रोड, कोंढवे-धावडे, पुणे-४११०२३

९) सौ. सुनिता प्रदीप गव्हाणे-सदस्य
गव्हाणे आळी, पिंपरी वाघिरे, पिंपरी, पुणे-४११०१७

कृपया खालील व्यक्तींची नावे परिशिष्ट - १ वर दि. ०५/१०/२०२३ ते दि.०४/१०/२०२८ पर्यंत नोंदविण्यात यावीत.

१) श्री. रोहिदास रामभाऊ धावडे- अध्यक्ष
सर्व्हे नं.१५, रामभाऊ धावडे चाळ, विठ्ठल मंदिराजवळ,
उत्तमनगर, पुणे- ४११०२३

२) सौ. आशा रोहिदास धावडे- उपाध्यक्ष
सर्व्हे नं.१५, रामभाऊ धावडे चाळ, विठ्ठल मंदिराजवळ,
उत्तमनगर, पुणे- ४११०२३

PRESIDENT
SHRI RAMMUKTA EDUCATION SOCIETY
Uttamnagar, Pune-411 023.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

| | | |
|---|---|---|
| ३) श्री. रोहन रोहिदास धावडे- सचिव<br>सर्व्हे नं.१५, रामभाऊ धावडे चाळ, विठ्ठल मंदिराजवळ,<br>उत्तमनगर, पुणे- ४११०२३ | | |
| ४) सौ. अश्विनी प्रणय काटे- खजिनदार<br>बिल्डींग नं.४, फ्लॅट नं.४०२, एस. व्ही. रोड, प्रेम नगर,<br>बोरीवली वेस्ट, मुंबई-४०००९२ | | |
| ५) श्री. दीपक गजानन गव्हाणे- सदस्य<br>गव्हाणे आळी, शिवाजी पुतळ्याजवळ, पिंपरी गाव, पुणे-<br>४११०१७ | | |
| ६) श्री. ऋषिकेश भानुदास कलाटे- सदस्य<br>सर्व्हे नं. १४७/२/३, रामचंद निवास, वाकडकर वस्ती,<br>मारुंजी, वाकड, पुणे- ४११०५७ | | |
| ७) सौ. स्नेहल स्वप्निल वाघेरे- सदस्य<br>सर्व्हे नं.१८१, हिरा-स्मृती, पवना मित्र मंडळाजवळ, पिंपरी<br>गाव, पुणे- ४११०१७ | | |
| ८) सौ. कावेरी योगेश कटके- सदस्य<br>घर नं. ६३८, एन.डी.ए. रोड, कोंढवे-धावडे, पुणे-४११०२३ | | |
| ९) सौ. सुनिता प्रदीप गव्हाणे-सदस्य<br>गव्हाणे आळी, पिंपरी वाघिरे, पिंपरी, पुणे-४११०१७ | | |

स्थळ: पुणे

दि. २८/१२/२०२३

28/12/2023

श्री. रोहिदास रामभाऊ धावडे

(बदल अर्ज करणार सही)

PRESIDENT
SHRI RAMMUKTA EDUCATION SOCIETY
Uttamnagar, Pune-411 023.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

## पडताळा

मी, श्री. रोहिदास रामभाऊ धावडे, राहणार: सर्व्हे नं.१५, रामभाऊ धावडे चाळ, विठ्ठल मंदिराजवळ, उत्तमनगर, पुणे- ४११०२३, प्रतिज्ञापूर्वक इकरार करतो की, सदर बदल अर्जात नमूद सर्व माहिती ही माझ्या उत्तम माहिती आणि समजुती प्रमाणे खरी आणि बरोबर आहे.

स्थळ: पुणे

दि. २८/१२/२०२३

**मी अर्जदारास ओळखतो,**

28/12/2023 28/12/23

**ॲड. निलेश विजय पवार** **श्री. रोहिदास रामभाऊ धावडे**

**(अर्जदारातर्फे वकील)** **(बदल अर्ज करणार सही)**

28/12/2023

Solemlny affirmed before me
that the facts mentioned in
application are true to the
best of his information and belief
by Sau/Shri Rohidas Rambhau Dhawade
(Adhar No. 233601630968)
who is identined before me
by Adv./ID Nilesh Vijay Pawar
Whom I personally Known
Date : 28/12/2023

28/12/23
**Superintendent**
**Public Trust Registration Office**
**Pune Region, Pune**

**PRESIDENT**
SHRI RAMMUKTA EDUCATION SOCIETY
Uttamnagar, Pune-411 023.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे